महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.**

**दूरध्वनी क्र. ०२२-२२०१७१०६** **ई मेल:** sopr२.rdd-mh@nic.in

क्रमांक:जिपनि-२०२५/प्र.क्र.१३०/ई-१५७२७३६/पं.रा.-२ दिनांक : २४ एप्रिल, २०२६

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त,

(२) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य

**विषय:-** राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीमध्ये नामनिर्देशनाने सदस्यांची नियुक्तीबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा.

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार मध्ये सन, २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमाची प्रत (मराठी व इंग्रजी) सोबत जोडली असून तिचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

**सहपत्र:-** अधिनियम (मराठी व इंग्रजी) प्रत.

(व. मुं. भरोसे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत: कार्यासन पंचायत राज-२, संग्रहार्थ.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक ११]　　बुधवार, एप्रिल १५, २०२६/चैत्र २५, शके १९४८　　[पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. .. | पृष्ठे १-५ |

दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६२ चा महा. ५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईलः- १९६२ चा महा. ५.

"(क) जिल्हाधिकाऱ्याने, नामनिर्देशित सभासद म्हणून नामनिर्देशित करावयाच्या, निवडून आलेल्या सभासदांच्या एकूण संख्येच्या दहा टक्के किंवा किमान पाच सभासद, यांपैकी जे अधिक असेल तितक्या जिल्हा परिषदांच्या प्रशासनातील विशेष ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तीः

परंतु, खंड (क) मध्ये निर्देशित केलेल्या नामनिर्देशित सभासदांना,—

(एक) जिल्हा परिषदेच्या आणि जिल्हा परिषदेच्या समित्यांच्या कोणत्याही बैठकीत मतदान करण्याचा, आणि

(दोन) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून अथवा जिल्हा परिषदेच्या समित्यांपैकी कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा,

हक्क असणार नाही.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १० ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(४) नामनिर्देशित सभासदांचा पदावधी, जिल्हा परिषदेच्या मुदती बरोबरच समाप्त होईल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ मध्ये नवीन कलम १०-१अ समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सभासदांचे नामनिर्देशन.

"**१०-१अ.** (१) जिल्हाधिकारी, अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, सभासदांचे नामनिर्देशन करण्याच्या प्रयोजनासाठी एक विशेष बैठक बोलावील.

(२) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये सभासदांचे नामनिर्देशन, विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बोलविलेल्या बैठकीचे अध्यक्षस्थान, जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे नियुक्त करील असा अधिकारी भूषवील. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी, जेव्हा अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवित असेल तेव्हा, त्यास, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, जेव्हा जिल्हा परिषदेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवित असेल तेव्हा, त्यास, जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु, मतदान करण्याचा हक्क असणार नाहीः

परंतु, बैठकींतील कार्यवाहीचे नियमन करण्याबाबत (त्यात आवश्यक असलेल्या गणसंख्येसह) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणाऱ्या अधिकाऱ्यास, त्याच्या मते जी पुरेशी आहेत अशा कारणांसाठी, अशी बैठक स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) सभासदांचे नामनिर्देशन करताना, जिल्हाधिकारी, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि अशा प्रत्येक पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनियम करून, शक्यतोवर, जिल्हा परिषदेमधील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सभासदांचे नामनिर्देशन करीलः

परंतु, या पोट-कलमान्वये, मान्यताप्राप्त पक्षांच्या किंवा नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या तौलानिक संख्याबळाच्या निर्णय घेण्याच्या प्रयोजनासाठी,मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट, किंवा अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसलेला निर्वाचित सभासदांस, महाराष्ट्र

स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६, मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या कालावधीत, आघाडी तयार करता येईल, आणि तिची नोंदणी झाल्यावर, उक्त अधिनियमाच्या तरतुदी निवडणूक पूर्व आघाडी असल्याप्रमाणे, अशा आघाडीच्या सभासदांना लागू होतील. १९८७ चा महा. २०.

(५) नामनिर्देशित सभासदांची नावे देखील, राज्य निवडणूक आयोगाद्वारे **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येतील.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक पंचायत समितीमध्ये,—

(अ) कलम ५८ मध्ये आणि त्याबाबतीत नियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार प्रत्येक निर्वाचक गणामधून प्रत्येकी एक याप्रमाणे प्रत्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असेल :

परंतु, पंचायत समितीच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या यांमधील गुणोत्तर, व्यवहार्य असेल तेथवर, संपूर्ण राज्यामध्ये सारखेच असेल;

"(ब) जिल्हाधिकाऱ्याने, नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशित करावयाच्या, निवडून आलेल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या वीस टक्के किंवा किमान एक सदस्य, यांपैकी जे अधिक असेल तितक्या जिल्हा परिषदांच्या किंवा पंचायत समित्यांच्या प्रशासनातील विशेष ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश असेल :

परंतु, खंड (ब) मध्ये निर्देशित केलेल्या नामनिर्देशित सदस्यांना,—

(एक) पंचायत समितीच्या आणि पंचायत समितीच्या समित्यांच्या कोणत्याही बैठकीत मतदान करण्याचा, आणि

(दोन) पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती म्हणून अथवा पंचायत समितीच्या समित्यांपैकी कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा,

हक्क असणार नाही.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(४) नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी, पंचायत समितीच्या मुदती बरोबरच समाप्त होईल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ मध्ये नवीन कलम ५९अ समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सदस्यांचे नामनिर्देशन.

"**५९अ.** (१) जिल्हाधिकारी, सभापतीच्या निवडणुकीनंतर, सदस्यांचे नामनिर्देशन करण्याच्या प्रयोजनासाठी एक विशेष बैठक बोलावील.

(२) कलम ५७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये सदस्यांचे नामनिर्देशन, विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बोलविलेल्या बैठकीचे अध्यक्षस्थान, जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे नियुक्त करील असा अधिकारी भूषवील. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी, जेव्हा अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवित असेल तेव्हा, त्यास, पंचायत समितीचा सभापती, जेव्हा पंचायत समितीच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवित असेल तेव्हा, त्यास,

जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु, मतदान करण्याचा हक्क असणार नाही:

परंतु, बैठकींतील कार्यवाहीचे नियमन करण्याबाबत (त्यात आवश्यक असलेल्या गणसंख्येसह) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणाऱ्या अधिकाऱ्यास, त्याच्या मते जी पुरेशी आहेत अशा कारणांसाठी, अशी बैठक स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) सदस्यांचे नामनिर्देशन करताना, जिल्हाधिकारी, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि अशा प्रत्येक पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करून, शक्यतोवर, पंचायत समितीमधील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशित करील :

परंतु, या पोट-कलमान्वये, मान्यताप्राप्त पक्षांच्या किंवा नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या तौलानिक संख्याबळाचा निर्णय घेण्याच्या प्रयोजनासाठी,मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट, किंवा अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसलेला निर्वाचित सदस्यांस, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या कालावधीत, आघाडी तयार करता येईल, आणि तिची नोंदणी झाल्यावर, उक्त अधिनियमाच्या तरतुदी निवडणूक पूर्व आघाडी असल्याप्रमाणे,अशा आघाडीच्या सदस्यांना लागू होतील. १९८७ चा महा. २०.

(५) नामनिर्देशित सदस्यांची नावे देखील, राज्य निवडणूक आयोगाद्वारे **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येतील.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २७४ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम २७४ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(१) खंड (१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-अ) कलम १०-१अ च्या पोट-कलम (२) अन्वये, परिषद सभासदांचे नामनिर्देशन करण्याची रीत विहित करणे;".

(२) खंड (१३) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(१४) कलम ५९अ च्या पोट-कलम (२) अन्वये, सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची रीत विहित करणे;".

९. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, देता येतील : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १२, अंक २१] बुधवार, एप्रिल १५, २०२६/चैत्र २५, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ४७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* (Second Amendment) Act, 2026 (Mah. Act No. XVII of 2026), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

### MAHARASHTRA ACT No. XVII OF 2026.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 15th April 2026).*

An Act further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

Mah. V of 1962. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* Act, 1961, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Seventy-seventh Year of the Republic of India as follows:—

**1.** This Act may be called the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* (Second Amendment) Act, 2026. Short title.

Amendment of section 9 of Mah. V of 1962.

**2.** In section 9 of the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* Act, 1961 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*1*), after clause (*b*), the following clause shall be added , namely :– Mah. V of 1962.

"(*c*) ten per cent. of the total number of elected Councillor or minimum five persons, whichever is higher, having special knowledge or experience in respect of the administration of *Zilla Parishads* to be nominated by the Collector as nominated Councillors:

Provided that, the nominated Councillors referred to in clause (*c*) shall have no right to,—

(*i*) vote at any meeting of the *Zilla Parishad* and committees of the *Zilla Parishad*; and

(*ii*) get elected as a President or Vice-President of a *Zilla Parishad* or Chairperson of any of the committees of the *Zilla Parishad*.".

Amendment of section 10 of Mah. V of 1962.

**3.** In section 10 of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely:-

"(*4*) The term of the office of the nominated Councillor shall be co-terminus with the duration of the *Zilla Parishad*.".

Insertion of new section 10-1A in Mah. V of 1962.

**4.** After section 10 of the principal Act, the following section shall be inserted, namely :–

Nomination of Councillors.

"**10-1A.** (*1*) After election of President, the Collector shall call a special meeting for the purpose of nominating Councillors.

(*2*) The nomination of the Councillors under clause (*c*) of sub-section (*1*) of section 9 shall be made in the prescribed manner.

(*3*) The meeting called under sub-section (*1*) shall be presided over by the Collector or such officer as the Collector may by order in writing appoint in this behalf. The Collector or such officer when presiding over such meeting shall have the same powers as the President of the *Zilla Parishad* when presiding over a meeting of the *Zilla Parishad* has, but shall have no right to vote :

Provided that, notwithstanding anything contained in this Act, for regulating the procedure at meetings (including the quorum required thereat), the Collector or the officer presiding over such meeting may, for reasons which in his opinion are sufficient, refuse to adjourn such meeting.

(*4*) While nominating the Councillors, the Collector shall take into account the relative strength of recognized parties or registered parties or groups and nominate Councillors, as nearly as may be, in proportion to the strength of such parties or groups in the *Zilla Parishad* after consulting the leader of each such party or group:

Provided that, for the purpose of deciding the relative strength of the recognized parties or registered parties or groups under this sub-section, the recognized parties or registered parties or groups, or elected Councillor not belonging to any such party or group, may, notwithstanding anything contained in the Maharashtra Local Authority Members Disqualification Act, 1986, within a period of not more than three months from the date Mah. XX of 1987.

of notification of election results, form the *aghadi* or front, and, on its registration, the provisions of the said Act shall apply to the members of such *aghadi* or front, as it is a pre-poll *aghadi* or front.

(*5*) The names of the nominated Councillors shall also be published by the State Election Commission in the *Official Gazette*.".

**5.** In section 57 of the principal Act, for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :– Amendment of section 57 of Mah. V of 1962.

"(*1*) Every *Panchayat Samiti* shall consist of,–

(*a*) members elected by direct one each from each electoral college in accordance with the provisions contained in section 58 and the rules in that behalf :

Provided that, the ratio between the population of the territorial area of a *Panchayat Samiti* and the number of seats in such *Panchayat Samiti* to be filled in by election shall, as far as practicable, be the same throughout the State;

(*b*) twenty per cent. of the total number of elected member or minimum one person, whichever is higher, having special knowledge or experience in respect of the administration of *Zilla Parishads* or *Panchayat Samitis* to be nominated by the Collector as nominated members:

Provided that, the nominated members referred to in clause (*b*) shall have no right to,—

(*i*) vote at any meeting of the *Panchayat Samiti* and committees of the *Panchayat Samiti*; and

(*ii*) get elected as a Chairman or Deputy Chairman of a *Panchayat Samiti* or Chairperson of any of the committees of the *Panchayat Samiti*.".

**6.** In section 59 of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely:- Amendment of section 59 of Mah. V of 1962.

"(*4*) The term of the office of the nominated member shall be co-terminus with the duration of the *Panchayat Samiti*.".

**7.** After section 59 of the principal Act, the following section shall be inserted, namely:- Insertion of new section 59A in Mah. V of 1962.

"**59A.** (*1*) After election of Chairman, the Collector shall call a special meeting for the purpose of nominating members. Nomination of members.

(*2*) The nomination of the members under clause (*b*) of sub-section (*1*) of section 57 shall be made in the prescribed manner.

(*3*) The meeting called under sub-section (*1*) shall be presided over by the Collector or such officer as the Collector may by order in writing appoint in this behalf. The Collector or such officer when presiding over such meeting shall have the same powers as the Chairman of a *Panchayat Samiti* when presiding over a meeting of the *Panchayat Samiti* has, but shall have no right to vote:

Provided that, notwithstanding anything contained in this Act, for regulating the procedure at meetings (including the quorum required thereat), the Collector or the officer presiding over such meeting may, for reasons which in his opinion are sufficient, refuse to adjourn such meeting.

(4) While nominating the members, the Collector shall take into account the relative strength of recognized parties or registered parties or groups and nominate members, as nearly as may be, in proportion to the strength of such parties or groups in the *Panchayat Samiti*, after consulting the leader of each such party or group:

Provided that, for the purpose of deciding the relative strength of the recognized parties or registered parties or groups under this sub-section, the recognized parties or registered parties or groups, or elected member not belonging to any such party or group, may, notwithstanding anything contained in the Maharashtra Local Authority Members Disqualification Act, 1986, within a period of not more than three months from the date of notification of election results, form the *aghadi* or front, and, on its registration, the provisions of the said Act shall apply to the members of such *aghadi* or front, as it is a pre-poll *aghadi* or front. Mah. XX of 1987.

(5) The names of the nominated members shall also be published by the State Election Commission in the *Official Gazette*.".

Amendment to section 274 of Mah. V of 1962.

**8.** In section 274 of the principal Act, in sub-section (*2*),–

(*1*) after clause (*i*), the following clause shall be inserted, namely:–

"(*i-a*) under sub-section (*2*) of section 10-1A, prescribing the manner of the nomination of the Councillor;".

(*2*) after clause (*xiii*), the following clause shall be inserted, namely :–

"(*xiv*) under sub-section (*2*) of section 59A, prescribing the manner of the nomination of the member;".

Power to remove difficulties.

**9.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the principal Act, as amended by this Act, the State Government may, by order, published in the *Official Gazette*, give such direction, not inconsistent with the provisions of the principal Act, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty:

Provided that, no such order shall be made after the expiry of the period of two years from the date of commencement of this Act.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.